मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » सोमवार, दि. 7 जुलै 2025 | पान- 1

# पवना धरण क्षेत्रात संततधार, धरणातून 1600 क्युसेक्सने विसर्ग सुरु

## नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा : सध्या धरणात 75.69 टक्के एवढा पाणीसाठा झाला

**पिंपरी | प्रतिनिधी**

पवना धरण पाणलोट क्षेत्रात कालपासून संततधार पाऊस सुरू आहे. त्यामुळे धरणाच्या पातळीत झपाट्याने वाढ होत आहे. सध्या धरणात ७५.६९ टक्के एवढा पाणीसाठा झाला आहे. (दि.०६) दुपारी २.३० वाजल्यापासून धरणातून १६०० क्युसेक्सने विसर्ग सुरू करण्यात आला आहे. तरी मावळ, पिंपरी चिंचवड मधील नदीकाठच्या नागरिकांनी सतर्क रहावे असा इशारा पवना धरण पूर नियंत्रण कक्षाच्या वतीने देण्यात आला आहे.



पवना नदी काठच्या सर्व नागरीकांना सूचित करण्यात येत आहे, की पवना धरण सद्यस्थितीमध्ये ७५.६९ टक्के एवढे भरलेले आहे. पाणलोट क्षेत्रात पाऊस चालू असून धरणामध्ये मोठा येवा प्राप्त होत आहे.

धरणातील पाणीसाठा नियंत्रित करणेकरिता सांडव्याद्वारे नदीपात्रामध्ये नियंत्रित पद्धतीने ८०० क्युसेक्स मुक्त विसर्ग करण्यात येत आहे. तरी, आज (दि.०६) दुपारी २.३० वाजता पाणलोट क्षेत्रातील येव्यानुसार सांडव्यावरील विसर्गामध्ये वाढ होऊन एकुण विसर्ग १६०० क्युसेक्स इतका राहणार आहे. पाणलोट क्षेत्रातील पावसाच्या प्रमाणानुसार व येव्यानुसार धरणातून नदीपात्रात होणारा विसर्ग कमी/जास्त होण्याची शक्यता आहे.

### विसर्ग कमी/जास्त होण्याची शक्यता

» पाणलोट क्षेत्रातील पावसाच्या प्रमाणानुसार व येव्यानुसार धरणातून नदीपात्रात होणारा विसर्ग कमी/जास्त होण्याची शक्यता आहे. तरी पवना नदी काठच्या सर्व नागरीकांना सूचित करण्यात येते की, कृपया कोणीही नदीपात्रात उतरू नये. नदी मधील पाण्याचे पंप, नदी काठचे शेती अवजारे व तत्सम साहित्य अथवा जनावरे असल्यास ती तात्काळ सुरक्षित ठिकाणी हलविण्यात यावित. सखल भागातील संबंधित नागरिकांना सूचना देण्यात याव्यात, सर्वांनी योग्य ती खबरदारी व दक्षता घेत जलसंपदा विभागास व प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन पाटबंधारे विभागाकडून करण्यात येत आहे.

तरी पवना नदी काठच्या सर्व नागरीकांना सूचित करण्यात येते की, कृपया कोणीही नदीपात्रात उतरू नये. नदी मधील पाण्याचे पंप, नदी काठचे शेती अवजारे व तत्सम साहित्य अथवा जनावरे असल्यास ती तात्काळ सुरक्षित ठिकाणी हलविण्यात यावीत. सखल भागातील संबंधित नागरिकांना सूचना देण्यात याव्यात, सर्वांनी योग्य ती खबरदारी व दक्षता घेत जलसंपदा विभागास व प्रशासनास सहकार्य करावे असे आवाहन पवना धरण पूरनियंत्रण कक्षाच्या वतीने करण्यात आले आहे.

# आषाढी एकादशीनिमित्त श्री विठ्ठल-रूक्मिणी मंदिरात फळवाटप

## कृष्णानगरमधील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदीरात फराळ आणि फळवाटप करण्यात आले

**चिखली| प्रतिनिधी**

आषाढी एकादशीनिमित्त कृष्णानगरमधील श्री विठ्ठल-रूक्मिणी मंदीरात फराळ आणि फळवाटप करण्यात आले. श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज प्रतिष्ठान, किर्तीताई मारूती जाधव युथ फाऊंडेशन आणि आमदार महेश दादा लांडगे युवा मंचच्या वतीने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. स्व. कै. हिराबाई किसनराव लांडगे यांच्या पुण्यस्मरणार्थ या उपक्रमाचे संपूर्ण नियोजन श्री.मारुती जाधव आणि किर्ती मारुती जाधव यांच्या पुढाकाराने करण्यात आले होते.

यावेळी आलेल्या भाविकांनी पंढरपूरची वारी मंदिरातच अनुभवली. जे भाविक प्रत्यक्ष पंढरपूर वारीस जाऊ शकत नाहीत, त्यांच्यासाठी या मंदिरातच विठ्ठलनामाच्या गजरात, एकात्मतेच्या भावनेत हा कार्यक्रम पार पडला. विठ्ठलाची प्रार्थना, भक्तिमय वातावरण, आणि फराळ वाटप यामुळे पंढरपूरचीच अनुभूती लाभली. या प्रसंगी सर्वच वयोगटांतील उपवास करणाऱ्या महिला, पुरुष व बालकांसाठी स्वादिष्ट फराळाचे वाटप करण्यात आले.




यावेळी उपस्थितामध्ये भास्कर गावडे ,प्रभाकर भोळे, शिवानंद चौगुले,संतोष जाधव, धनंजय जाधव, संदीप दीक्षित, निवृत्ती म्हेत्रे, लहू म्हेत्रे, कृष्णा जाधव , तसेच मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

# डॉक्टर्स डे निमित्त मधुमेह जनजागृती कार्यक्रम उत्साहात संपन्न

## प्रा. जे. नागरिक संघ आणि मधुमेह रुग्ण संघ यांच्या संयुक्त विद्यमाने डॉक्टर्स डे निमित्त जनजागृती आणि आरोग्याबाबत मार्गदर्शन

**चिखली-| प्रतिनिधी**

प्रा. जे. नागरिक संघ आणि मधुमेह रुग्ण संघ यांच्या संयुक्त विद्यमाने डॉक्टर्स डे निमित्त जनजागृती आणि आरोग्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

माऊली उद्यान, येथे कार्यक्रम आयोजित करण्यात आला. आशा नष्टे यांनी मधुर स्वागतगीत सादर केले. यानंतर प्रमुख पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. डॉ. दिगंबर इंगोले (अध्यक्ष, मधुमेह रुग्ण संघ) यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करत संघटनेच्या कार्याची आणि उद्दिष्टांची माहिती दिली.प्रा. जे. नागरिक संघाचे अध्यक्ष आनंदराव मुळूक यांनी मनोगत व्यक्त केले आणि समाजात आरोग्याबाबत जनजागृतीचे महत्व अधोरेखित केले. पाहुण्यांची ओळख सचिव




चांदबी सय्यद यांनी करून दिली. डॉ. अनु गायकवाड यांनी "तुझ आहे तुझपाशी" या यूक्तीनुसार मधुमेही रुग्णांचं मधुमेहाचा कंट्रोल कसं त्यांच्याच हातात आहे, या विषयावर मधुमेह रुग्णांना मार्गदर्शन केले. त्यांनी मधुमेहाची कारणे व प्रतिबंध, मधुमेहाबद्दल असलेले गैरसमज, मधुमेहावर चालू असलेल्या उपचारांचे औषध गोळ्या व इन्सुलिन यांचे शरीरावर होणारे परिणाम आणि त्याबद्दल असलेले सामान्य लोकांचे गैरसमज, मधुमेह असलेल्या रुग्णांचा आहार कसा असावा, व्यायामाचे फायदे, याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. डॉ. दिगंबर इंगोले, डॉ. रजनी जैन, डॉ. उन्नरकर, डॉ. गुणवंत चिखलीकर, डॉ. दामोदर बऱ्हाटे, डॉ. अरविंद वाघचौरे, आणि डॉ. माऊली फरांदे.संदेश जगताप यांनी सर्व डॉक्टरांना गुलाब पुष्प देऊन त्यांचा सत्कार केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. ज्योती इंगोले यांनी केले. त्यांचाही यावेळी सन्मान करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुभाष जोशी (उपाध्यक्ष), नरेंद्र मिसाळ (खजिनदार) तसेच सर्व कार्यकारिणी सदस्यांचे मोलाचे सहकार्य लाभले. शेवटी माजी अध्यक्ष श्यामसुंदर परदेशी यांनी आभारप्रदर्शन केले.



# दत्ता सानेंच्या स्मृतिप्रित्यर्थ गोसेवा

## गोसेवा उपक्रमांतर्गत पांजरपोळ गोशाळा, भोसरी येथे चारादान करण्यात आले

**चिखली-| प्रतिनिधी**

महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते दत्ता साने यांच्या पाचव्या पुण्यस्मरणानिमित्त शुक्रवारी (दि. ४) विविध समाजोपयोगी उपक्रम घेण्यात आले.

गोसेवा उपक्रमांतर्गत पांजरपोळ गोशाळा, भोसरी येथे चारादान करण्यात आले. यावेळी दत्ता साने यांचे चिरंजीव आणि राष्ट्रवादी काँग्रेस सेल चे माजी अध्यक्ष यश साने, साने कुटूंबिय, मित्र परिवार टाळगाव चिखली येथील ग्रामस्थ उपस्थित होते. उपस्थितांनी गोसेवेच्या माध्यमातून समाजसेवेचे महत्त्व अधोरेखित केले. सामाजिक कार्यासाठी सतत झटणाऱ्या, जनतेच्या सेवेसाठी आयुष्य समर्पित करणाऱ्या दत्ता काका साने




स्मृतिपित्यर्थ हा उपक्रम पार पडला.

या उपक्रमाचे आय़ोजन दत्ताकाका साने प्रतिष्ठान, राजमाता जिजाऊ सहकारी पतसंस्था मर्यादीत, वीर अभिमन्यू फ्रेंड सर्कल, साने चौक, श्री क्षेत्र टाळगाव चिखली ग्रामस्थांनी केले होते.

# ठेकेदारावर पालिका आयुक्त मेहेरबान

## शहरातील मालमत्ता सर्वेक्षणात झाला गोलमाल; निविदेनुसार ४८ कोटी रुपयांचा खर्च, पण ठेकेदाराला आणखी २९ कोटी देणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

स्थानिक स्वराज्य संस्थांचा उत्पन्नाचा प्रमुख स्त्रोत म्हणून मालमत्ता कराकडे पाहिले जाते. त्यानूसार शहरातील सर्व मिळकती कराच्या कक्षेत आणण्यासाठी ड्रोन सर्वेक्षणाद्वारे मिळकतींचे सर्वेक्षण करण्यास सुरवात केली. त्यात एकूण ९ लाख ५० हजार २१३ मालमत्ता आढळून आल्या. त्यापैकी ३ लाख ७० हजार २१३ मालमत्ता या नोंदणी कराच्या कक्षेत नसल्याचे आढळून आले. त्यामुळे सर्वेक्षण करणाऱ्या ठेकेदार एजन्सीला यापूर्वीच्या ४८ कोटी रुपयांव्यतिरिक्त आणखी २९ कोटी रूपये अधिकचे देण्यात येणार आहेत. या ठेकेदारावर आयुक्त हे मेहेरबान असून मालमत्ता सर्वेक्षणावर ७७ कोटींचा चुराडा होवू लागला आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व संकलन विभागामार्फत शहरातील इमारत व जमिनीवर मालमत्ता कर आकारणी व वसुली करण्यात येत आहे. जिओ सिक्वेन्सिंग करून मनपा क्षेत्रातील सर्व मालमत्तांना प्रत्यक्ष स्थळावर जावून नवीन मालमत्ता क्रमांक देण्याचा निर्णय घेण्यात आला. यामध्ये नव्याने कर आकारणी, पुन: कर आकारणी, स्वयं मुल्यांकन, मालमत्ता नोंदणी, सवलत योजना, मालमत्ता हस्तांतरण, मालमत्ता कर उतारा आदींचा समावेश केला. महापालिकेने शहरातील सर्व मालमत्तांचे ड्रोनद्वारे सर्वेक्षण करण्यास सुरुवात केली. त्यात ९ लाख ५० हजार २१३ मालमत्ता आढळून आल्या आहेत. त्यापैकी ३ लाख ७० हजार २१३ मालमत्ता या नोंदणी नसलेल्या आहेत. त्यामुळे सर्वेक्षण करणाऱ्या खासगी एजन्सीला ४८ कोटी रूपयांव्यतिरिक्त तब्बल २९ कोटी रूपये अधिकचे दिले जाणार आहेत.



### घर टू घर , ड्रोन सर्वेक्षणावर वारेमाप खर्च

» आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून महापालिका शहरातील मालमत्तांची वाढती संख्या विचारात घेता या मालमत्तांचे ड्रोनद्वारे सर्वेक्षण करण्याचे काम सुरु केले. अगोदर घर टू घर सर्वेक्षण करण्यात येत होते. त्यावर ४८ कोटीचा खर्च केला. त्यानंतर प्रत्येक मिळकतीचे सुक्ष्म मोजमाप व्हावे. नोंदणी नसलेल्या मालमत्ता आता कर कक्षेत आणण्याचा उद्देशाने ड्रोन सर्वेक्षण सुरु केले. तसेच अनधिकृत बांधकामांना देखील आळा बसेल असं सांगितले. मालमत्ता कर हा महापालिकेचा मुख्य उत्पन्नाचा स्त्रोत असला तरीही शहरात सुमारे ६ लाख ३० हजार मालमत्ता आजमितीस नोंदविल्या आहेत. ड्रोन सर्वेक्षण प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर यात वाढ झालेली आहे. परंतू, दोन्ही एकाच सर्वेक्षणावर वेगवेगळ्या माध्यमातून ७७ कोटी खर्च करण्यात आलेला आहे.

### जून्या सर्वेक्षणातील मालमत्ताची नोंदी कधी?

» अनेक जण मालमत्तांची महापालिकेच्या दप्तरी नोंद नसल्याचे वेळोवेळी झालेल्या सर्वेक्षणातून समोर आले आहे. यापूर्वी महापालिकेने २०१३ मध्ये सर्वेक्षण केले असता यामध्ये सुमारे ३५ हजार तर २०२१ मध्ये झालेल्या सर्वेक्षणात २१ हजार नवीन मालमत्ता आढळून आल्या होत्या. त्या ५६ हजार मिळकतीच्या नोंदी लावण्यास विलंब लावला. त्यानंतर ६ वर्ष मागे जावून नोंदी लावण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे आता ३ लाख ७० हजार मालमत्तेच्या नोंदी पुर्ण होवून मालमत्तेच्या कक्षेत कधी येणार आहे. हे सांगण्यास अधिकारी तयार नाहीत.

### दोन्ही सर्वेक्षण वेगळी दाखवून लुटमार

» मालमत्ता सर्वेक्षणासाठी नेमलेल्या स्थापत्य कन्सल्टंट या खासगी एजन्सीचे काम कासव गतीने सुरू आहे. महापालिकेचे मनुष्यबळ पुरवून ते काम पूर्ण करून घेतले जात आहे. महापालिकेकडे नोंदणीसाठी आलेले प्रस्ताव, नव्याने निर्माण झालेल्या हाऊसिंग सोसायट्या तसेच, अनेक महिन्यांपासून धूळ खात पडलेले प्रस्ताव त्या एजन्सीच्या माध्यमातून पुढे केले जात आहेत. मालमत्ता नोंदणीचा आकडा विविध प्रकारे फुगविण्यात आल्याचे आरोप केले जात आहेत. त्यामुळे या सर्वेक्षण कामावर संशय व्यक्त केला जात आहे.सर्वेक्षणावर वेगवेगळ्या माध्यमातून ७७ कोटी खर्च करण्यात आलेला आहे.

# 'पीएमआरडीए'ची अतिक्रमणविरोधी कारवाई लांबणार

## आवाहन करूनही सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प कार्यान्वित न करणा-या 16 सोसायटयांचा महापालिकेच्या पर्यावरण विभागाने पिण्याच्या पाण्याचे नळजोड खंडीत केले आहेत.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हद्दीतील अतिक्रमणे व अनधिकृत होर्डिंग हटविण्यासाठी पथक कार्यरत आहे; मात्र या पथकात अवघे दोनच अधिकारी आहेत.परिणामी, नियोजित कारवाया लांबणीवर पडणार असल्याची चिन्हे आहेत.

पीएमआरडीए हद्दीत अनेक ठिकाणी अनधिकृत बांधकामे व विनापरवाना होर्डिंग उभारण्यात आले आहेत. तसेच, रस्त्यालगतदेखील मोठे अतिक्रमण आहे. गेल्या वर्षभरात अतिक्रमण विरोधी पथकातील धडाकेबाज अधिकाऱ्यांनी अतिक्रमणांवर कारवाईचे सत्र सुरू केल्याने अतिक्रमणांना चाप बसला होता; मात्र त्या अधिकाऱ्यांची बदली झाल्यानंतर अतिक्रमाणांची संख्या वाढत आहे. त्यामुळे या ठिकाणी सक्षम अधिकारी नेमणे गरजेचे आहे.

राज्य शासनाच्या शंभर दिवसांच्या कार्यक्रमात पीएमआरडीएचा तिसरा क्रमांक आला होता. त्यात अतिक्रमणविरोधी पथक हे सर्वोत्कृष्ट पथक म्हणून गौरवले गेले होते. या पथकातील सक्षम अधिकाऱ्यांच्या कारवाईमुळे अनधिकृत होर्डिंगधारक आणि अनधिकृत बांधकाम करण्याऱ्यांचे धाबे दणाणले होते.




### अनधिकृत बांधकामविरोधी समिती कागदावरच

» पीएमआरडीएच्या पुढाकाराने सरपंच यांच्या अध्यक्षतेखाली ग्राम समिती स्थापन करण्यात येणार आहे. या समितीमुळे अनधिकृत बांधकामांवर नियंत्रण ठेवणे सोपे होणार आहे. तलाठी, पोलिस पाटील, कोतवाल, ग्रामसेवक हे या समितीमध्ये सदस्य आहेत; मात्र या समितीचा प्रस्ताव विभागीय कार्यालयाकडे पडून असल्याचे सांगण्यात येत आहे.

दरम्यान, या विभागातील तीन अधिकाऱ्यांच्या नुकत्याच बदल्या झाल्या आहेत. परिणामी, आता या विभागाचे प्रमुख म्हणून सहआयुकत आणि अन्य एक तहसीलदार हे दोनच अधिकारी आहेत. तर, अन्य कंत्राटी अभियंते व कर्मचारी आहेत.

परिणामी, या विभागाकडून महामार्गालगत उभारलेली अनधिकृत होर्डिंग आणि मावळ, मुळशी या पट्ट्यातील वाढत जाणाऱ्या अतिक्रमणांवर कारवाई करण्यात येणार होती; मात्र आता अपुऱ्या मनुष्यबळामुळे कारवाई लांबणीवर पडणार असल्याचे चित्र आहे.

# खडकवासला धरण साखळीतील धरणांच्या पाणीसाठ्यात झपाट्याने वाढ...

## चारही धरणांमध्ये आता 16.78 टीएमसी पाणी; गेल्या वर्षीपेक्षा 12 टीएमसी जास्त पाणीसाठा....

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला प्रकल्पातील चारही धरणांच्या पाणलोट क्षेत्रात सतत पाऊस पडत असल्याने धरण साखळीतील पाणीसाठा झपाट्याने वाढत आहे. सध्या चारही धरणांमध्ये एकूण १६.७८ टीएमसी पाणीसाठा साठा झाला आहे. गेल्या वर्षी याच तारखेला या धरणांमध्ये फक्त ४.७२ टीएमसी पाणीसाठा होता. यावर्षी मे महिन्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे आणि मान्सूनच्या आगमनानंतर सततच्या मुसळधार पावसामुळे धरणांच्या पाण्याची पातळी झपाट्याने वाढत आहे.

घाट परिसरात बुधवारी सायंकाळी ते गुरुवारी सायंकाळी ५ वाजेपर्यंत धरणांमध्ये १ टीएमसी पाणीसाठा झाला आहे. सध्या चारही धरणांमधील एकूण पाणीसाठा संपूर्ण वर्षभर शहराला पाणीपुरवठा करण्यास पुरेसा आहे. यामुळे पुणेकरांची पाण्याच्या चिंतेपासून मुक्तता मिळाली आहे.



### आतापर्यंत ३.१९ टीएमसी पाणी नदीत सोडण्यात आले आहे..

**» गेल्या वर्षी खडकवासला धरणातून अचानक पाणी नदीत सोडण्यात आल्यामुळे शहरातील अनेक भागात पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली होती. त्या घटनेनंतर तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पावसाळ्याच्या शेवटच्या काही दिवसांपर्यंत खडकवासला धरण अर्ध्यावर ठेवण्याचे निर्देश दिले होते. त्यानंतर प्रशासनाने खडकवासला धरणात फक्त ५० टक्के पाणी साठवण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार, धरणाची पाणी पातळी वाढल्याने प्रशासनाने या वर्षी आतापर्यंत खडकवासला धरणातून ३.१९ टीएमसी पाणी नदीत सोडले आहे.**

खडकवासला प्रकल्पात खडकवासला, वरसगाव, पानशेत आणि टेमघर या चार धरणांचा समावेश आहे. या चारही धरणांची एकूण साठवण क्षमता २९.१५ टीएमसी आहे. पुणे शहराला दरमहा १.२५ (चौथा) टीएमसी पाण्याची आवश्यकता आहे. पुणेकरांची ही पाण्याची गरज खडकवासला प्रकल्पातील चारही धरणांच्या पाण्याने भागवली जाते. यावर्षी या धरणांच्या पाणलोट क्षेत्रात सतत होणाऱ्या मुसळधार पावसामुळे खडकवासला धरण साखळीतील चारही धरणे भरली आहेत.

### कोणत्या धरणाची क्षमता किती

**» खडकवासला प्रकल्पात खडकवासला, वरसगाव, पानशेत आणि टेमघर ही चार धरणे समाविष्ट आहेत. या सर्व धरणांची एकूण पाणीसाठा क्षमता २९.१५ टीएमसी आहे. वरसगावची साठवण क्षमता १२.८२ टीएमसी आहे, पानशेत धरणाची एकूण साठवण क्षमता १०.६५ टीएमसी आहे, टेमघर धरणाची साठवण क्षमता ३.७१ टीएमसी आहे आणि खडकवासला धरणाची साठवण क्षमता १.९७ टीएमसी आहे.**

सध्या खडकवासला धरणात १.२८ टीएमसी (६४.७५%), पानशेतमध्ये ५.९२ टीएमसी (५५.५५%), वरसगावमध्ये ७.९० टीएमसी (६१.६३ टीएमसी) आणि टेमघर धरणात १.६९ टीएमसी (४५.५०%) पाणीसाठा आहे. गेल्या वर्षी खडकवासला धरणातून अचानक पाणी नदीत सोडण्यात आल्यामुळे शहरातील अनेक भागात पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली होती. त्या घटनेनंतर तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पावसाळ्याच्या शेवटच्या काही दिवसांपर्यंत खडकवासला धरण अर्ध्यावर ठेवण्याचे निर्देश दिले होते.

या चारही धरणांमध्ये एकूण १६.७८ टीएमसी (५७.५७%) टीएमसी पाणीसाठा आहे. गेल्या वर्षी याच तारखेला या धरणांमध्ये फक्त ४.७२ टीएमसी (१६.१९%) पाणीसाठा होता. गेल्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी मुसळधार पावसामुळे धरणांचा पाणीसाठा झपाट्याने वाढत आहे.

# आठ दिवसांत मोबदला होणार जाहीर ?

## पुरंदर तालुक्यातील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाच्या जागेची भूसंपादन प्रकिया अत्यंत वेगात सुरू आहे

**पुणे | प्रतिनिधी**

पुरंदर तालुक्यातील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाच्या जागेची भूसंपादन प्रकिया अत्यंत वेगात सुरू आहे. यापूर्वी शासनाने शेतकऱ्यांना वेळोवेळी नोटीस पाठवून एक-एक भूसंपादन प्रक्रियेचा टप्पा पूर्ण केला आहे. मागील आठवड्यात शेतकऱ्यांच्या हरकतीवरील सुनावणी प्रक्रिया पूर्ण झाल्याने आता शेतकऱ्यांशी चर्चा करून बांधावरील सर्व्हे करण्यात येणार आहे. त्याच बरोबर संपूर्ण शेतकऱ्यांचे ज्याकडे लक्ष लागले आहे तो म्हणजे विमानतळ जागेचा मोबदला काय असेल ? त्याच उत्तर लवकरच मिळणार असून येत्या आठवडाभरात मोबदला जाहीर होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

पुरंदर तालुक्यातील वनपुरी, उदाचीवाडी, कुंभारवळण, पारगाव, एखतपूर मुंजवडी, खानवडी अशा सात गावात शासनाचा विमानतळ प्रकल्प प्रस्तावित असून यासाठी 2832 हेक्टर जमीन संपादित करण्याची प्रक्रिया सध्या सुरु आहे. भूसंपादन प्रक्रियेचा नोटीस आणि त्यावरील हरकती हा मुद्दा आता जवळपास पूर्ण झाला आहे.

पुढील काळात आता महसूल विभाग, कृषी विभाग आणि ग्रामपंचायत विभागाच्या सहाय्याने थेट बांधावरील सर्व्हे करण्यात येणार आहे. त्यासाठी शेतकऱ्यांशी पुन्हा एकदा चर्चेची फेरी सुरू करण्यात येत आहे. मात्र ही प्रक्रिया सुद्धा केवळ कागदोपत्री दिखावा ठरणार आहे. कारण शेतकऱ्यांनी कितीही विरोध केला तरी विविध माध्यमातून शासनाने शेतकऱ्यांची बऱ्यापैकी माहिती जमा केली आहे. यावर आता वरिष्ठ पातळीवर हालचाली सुरु करण्यात आल्या आहेत. अधिवेशनाच्या अगदी शेवटच्या दिवशी सुद्धा यावर चर्चा होवून निर्णय घेतला जाण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे गेली अनेक दिवसापासून संपूर्ण राज्याला पडलेल्या प्रश्नाचे उत्तर येत्या आठवडाभरात मिळू शकते. याकडेच आता सर्वांचे लक्ष लागले आहे.



### जाहीर करण्याची औपचारीकता बाकी

**» सध्या विधानसभेचे पावसाळी अधिवेशन सुरू असून यामध्ये पुरंदर विमानतळ हा मुद्दा पुन्हा एकदा उपस्थित केला जाण्याची शकयता आहे. विशेष म्हणजे याबाबत आधीच निर्णय घेण्यात आला असून जाहीर करण्याची औपचारीकता बाकी आहे. कारण जिल्हाधिकारी कार्यालयाकडून मिळालेल्या माहिती नुसार येत्या आठ दिवसात विमानतळासाठी देण्यात येणारा मोबदला जाहीर करण्याची शक्यता आहे. तो जाहीर करण्यापूर्वी विधिमंडळात चर्चा घडवून आणली जात असून त्यादृष्टीने कामकाज सुरु आहे.**